The department distributed School material including school bags, registers, notebooks, compasses and pens to the children of the widows of farmers who committed suicide. In Kalamb, Osmanabad district on dated 11 June 2018 .





अमृतमहोत्सवी
पुढारी
स्थापना १९३९
प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक
औरंगाबाद **
गुरुवार । दि. २६ जुलै २०१८ । वर्ष २, अंक १९९ । मुंबई, पुणे, औरंगाबाद, कोल्हापूर, सांगली, सातारा, ठाणे, रायगड, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, अहमदनगर, नाशिक, सोलापूर, बेळगाव

# आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या मुलांना शैक्षणिक साहित्य वाटप

## वसंतराव नाईक महाविद्यालयाचा कळंब येथे उपक्रम



औरंगाबाद • डीबी स्टार

कर्जाला कंटाळून आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना वसंतराव नाईक महाविद्यालयाने मदतीचा हात दिला आहे. उस्मानाबादेतील कळंब येथे अशा मुलांना शैक्षणिक साहित्यांचे नुकतेच वाटप करण्यात आले.

समाजसेविका सुनंदाताई खराटे आणि वसंतराव नाईक महाविद्यालयातील समाजशास्त्र विभाग व कला महाविद्यालय बिडकीन यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबवण्यात आला. आत्महत्या केलेल्या शेतकरी विधवांच्या मुलांना शालेय साहित्याचे वाटप करण्याचा उपक्रम राबवण्यात आला. विधवांच्या मुलांनी इतर मुलांप्रमाणे प्राथमिक शिक्षण हसत खेळत पूर्ण केले पाहिजे, हा या उपक्रमामागील उद्देश असल्याचे महाविद्यालयाने सांगितले. उस्मानाबाद जिल्ह्यातील कळंब येथे हा उपक्रम राबवून साहित्याचे वाटप करण्यात आले. त्यामध्ये स्कूल बॅग, रजिस्टर, वह्या, कंपास आणि पेन इत्यादी साहित्याचा समावेश आहे.

वितरण कार्यक्रमाप्रसंगी संस्थेचे कार्यवाहक विश्वनाथ तोडकर म्हणाले की, आज विधवा, परित्यक्त्या, घटस्फोटित व एकल महिलांचे प्रश्न कल्पनाशक्तीच्या पलीकडचे आहेत. या सर्व महिलांच्या समस्यांवर विद्यापीठ पातळीवर संशोधन झाले पाहिजे. या वेळी शारदा खेडकर, डॉ. देवराज दगडे, डॉ. रामकिशन मुंडे, सुनंदा खराटे, विकास कुदळे, डॉ. रामकिशन मुंडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

या उपक्रमाबद्दल संस्थेचे अध्यक्ष राजाराम राठोड, सचिव नितीन राठोड, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मिलिंद उबाळे, प्रबंधक सीमा वडते, अधिष्ठाता संजय साळुंके, प्राचार्य दा. धो. काचोळे आदींनी अभिनंदन केले आहे. विद्यार्थी मोठ्या संख्येने कार्यक्रमाला उपस्थित होते.

PP - 2 26 July - 2018

The department of sociology distributed 50 good quality school bags and School material to the children in observation homes on the occasion of birthday of the Secretary Shri Nitinji Rajaram Rathod on Dated 11 July 2019.

